# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १२५/१०, १२६/१०, १२७/-१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. चंदाम बसगोंडा माळी,<br>मु.पो. धुळकरवाडी, जत, जि. सांगली<br>२) श्री. धर्मा भिवा मानकर,<br>मु.पो. आसंगी, जत, जि. सांगली<br>३) श्री. बाळू बाबू सुर्यवंशी,<br>मु.पो. जालीहाळ खुर्द, जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :- १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य-सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

या तिन्ही तक्रारी वेगवेगळ्या असल्यातरी कायद्याचा मुद्दा एकच आहे व विनंती उपाय योजना एकच आहे व संबंधित वितरण कंपनीचे अधिकारी तेच आहेत त्यामुळे सदरच्या तक्रारी एकत्र निकाली काढणेत येत आहेत.

प्रकरण क्र. १२५/१० मध्ये तक्रारदार श्री. चंदाम बसगोंडा माळी, रा. धुळकरवाडी, ता. जत, जि. सांगली यांनी नवीन शेतीपंप वीज पुरवठा मिळावा यासाठी गट क्र. ६२/२ मधील विहीरीसाठी वितरण कंपनीकडे रु. ११००+ १८००+ १००+ २० = एकूण रु. ३०२०/- हे पावती क्र. १८१७५०२ दि. २२.८.२००० नुसार भरलेले आहेत. तक्रारदार यांना आजतागायत वीज पुरवठा मिळालेला नाही. यातील रु.१००/- व रु. २०/- हे कपॅसिटर व करारापत्रासाठी भरुन घेतलेली रक्कम आजमितीला कालबाह्य झाल्याचे म्टटले आहे. मंचाकडून भरलेली सर्व रक्कम पहिल्या वीज देयकातून परत मिळावी व विद्युत पुरवठा मिळावा अशी मागणी केली आहे. त्यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १७.३.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने दि. १.६.२०१० रोजी आदेश पारित करुन एस.ओ.पी. प्रमाणे मुदतीत कनेक्शन देण्यात यावे, व कागदपत्रांची पडताळणी करुन कपॅसिटर फी व करारपत्र फीची रक्कम परत देणेबाबत योग्य ती कार्यवाही करणेचे आदेश दिले आहेत. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ८.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराने पैंसे भरल्याचे मान्य केले आहे. वि.प.ने तक्रारदाराकडून भरुन घेतलेले कपॅसिटर व करारपत्राचे रु. १००/- + रु. २०/-ही रक्कम वापस करण्याची तयारी दर्शविली आहे. सदरची रक्कम वीज कनेक्शन दिल्यानंतर पहिल्या बिलींग सायकलमधून समायोजित करण्यात येईल असे म्हटले आहे.

तक्रार क्र. १२६/१० यामध्ये तक्रारदार श्री. धर्मा भिवा मानकर, मु.पो. आसंगी, जत, जि. सांगली यांनी नवीन शेतीपंप वीज पुरवठा मिळावा यासाठी गट क्र. १०/२ मधील विहीरीसाठी वितरण कंपनीकडे रु. ७५०+ १०००+ ५०+ २० = एकूण रु. १८२०/- हे पावती क्र. ६७०४९८१ दि. २९.३.१९९७ नुसार भरलेले आहेत. तक्रारदार यांना आजतागायत वीज पुरवठा मिळालेला नाही. यातील रु. ५०/- व रु. २०/- हे कपॅसिटर व करारापत्रासाठी भरुन घेतलेली रक्कम आजमितीला कालबाह्य झाल्याचे म्टटले आहे. मंचाकडून भरलेली सर्व रक्कम पहिल्या वीज देयकातून परत मिळावी व विद्युत पुरवठा मिळावा अशी मागणी केली आहे. त्यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १७.३.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने दि. १.६.२०१० रोजी आदेश पारित करुन एस.ओ.पी. प्रमाणे मुदतीत कनेक्शन देण्यात यावे, मुख्य अभियंता (वितरण) यांचे परिपत्रक क्र ३४३०७ दि.३.११.२००७ नुसार ८ सप्टेंबर २००६ पासून भरलेली रक्कम परत करणेची असल्यामुळे तक्रारीतील नमूद तारीख २९.३.१९९७ असल्याने चलनामधील कपॅसिटर, करार फी परत देता येणार नाही असे म्हटले आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ८.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराने पैंसे भरल्याचे मान्य केले आहे. वि.प.ने तक्रारदाराकडून भरुन घेतलेले कपॅसिटर व करारपत्राचे रु. ५०/- + रु. २०/-ही रक्कम वापस करण्याची तयारी दर्शविली आहे. सदरची रक्कम वीज कनेक्शन दिल्यानंतर पहिल्या बिलींग सायकलमधून समायोजित करण्यात येईल असे म्हटले आहे.

तक्रार क्र. १२७/१० यामध्ये तक्रारदार बाळू बाबू सुर्यवंशी, मु.पो. जालीहाळ खुर्द, जत, सांगली

यांनी नवीन शेतीपंप वीज पुरवठा मिळावा यासाठी गट क्र. ५० मधील विहीरीसाठी वितरण कंपनीकडे रु. २०००+ १५००+ १००+ २० + १००० = एकूण रु. ४६२०/- हे पावती क्र. ६७७३१२९ दि. ११.०१.१९९९ नुसार भरलेले आहेत. तक्रारदार यांना आजतागायत वीज पुरवठा मिळालेला नाही. यातील रु. ५०/-, रु. २०/- व रु. १०००/- हे कपॅसिटर, करारापत्र व जादा लाईनचा खर्च यासाठी भरुन घेतलेली रक्कम आजमितीला कालबाह्य झाल्याचे म्टटले आहे.

मंचाकडून भरलेली सर्व रक्कम पहिल्या वीज देयकातून परत मिळावी व विद्युत पुरवठा मिळावा अशी मागणी केली आहे. त्यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १७.३.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने दि. १.६.२०१० रोजी आदेश पारित करुन एस.ओ.पी. प्रमाणे मुदतीत कनेक्शन देण्यात यावे, मुख्य अभियंता (वितरण) यांचे परिपत्रक क्र ३४३०७ दि.३.११.२००७ नुसार ८ सप्टेंबर २००६ पासून भरलेली रक्कम परत करणेची असल्यामुळे तक्रारीतील नमूद तारीख ११.०१.१९९९ असल्याने चलनामधील कपॅसिटर, करार फी परत देता येणार नाही असे म्हटले आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ८.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराने पैंसे भरल्याचे मान्य केले आहे. वि.प.ने तक्रारदाराकडून भरुन घेतलेले कपॅसिटर, करारपत्र व टर्मिनल पोलचे भरुन घेतलेले रु. ५०/- + रु. २०/- व रु. १०००/- ही रक्कम वापस करण्याची तयारी दर्शविली आहे. सदरची रक्कम वीज कनेक्शन दिल्यानंतर पहिल्या बिलींग सायकलमधून समायोजित करण्यात येईल असे म्हटले आहे.

प्रस्तुतच्या तिन्ही प्रकरणांची सुनावणी दि. २७.७.२०१० रोजी घेतली असतां, तक्रारदारांचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वितरण कंपनीतर्फे प्रभारी सहाय्यक अभियंता, संख श्री. मैंलापुरे, श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित. तक्रारदारांचे प्रतिनिधी यांनी मंचासमोर प्रतिपादन केले की, वितरण कंपनीने अद्याप वीज कनेक्शन दिले नाही तसेच कपॅसिटर फी रु. १००/- व करारपत्र फी रु. २०/- वीज बिलातून समायोजित करण्यात यावी. वितरण कंपनीने ती परत देण्याची तयारी दर्शविली आहे.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) या तिन्ही तक्रारीमध्ये तक्रारदार यांनी मागितल्याप्रमाणे संबंधित रकमा त्यांना परत मिळण्याचा हक्क आहे काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

या तिन्ही तक्रारींमध्ये विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या अटी विनियम २००५ अंमलात येण्यापूर्वी भरलेल्या आहेत. तसेच विद्युत नियामक आयोगाच्या दि. ८.९.२००६ च्या आदेशानुसार वि.प.ने परिपत्रक क्र ३४३०७ दि.३.११.२००७ काढले आहे व अशा रकमा परत करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या तक्रारींमध्ये तक्रारदार यांनी चाचणी अहवाल दिलेले आहेत याबद्दल वि.प.ने वाद उत्पन्न केला नाही. तक्रार क्र. तक्रार क्र. १२५/१० मध्ये रु. १२०/-, १२६/१० मध्ये रु. ७०/- व तक्रार क्र. १२७/१० मध्ये रु. १०७०/- ची मागणी केली आहे. वि.प.ने या रकमा परत करण्याची तयारी दर्शविली आहे. अंतर्गत कक्षाने ही रक्कम देण्यास नकार दिला आहे, त्याचे कारण दिले नाही. या तिन्ही प्रकरणांमध्ये विद्युत पुरवठा झालेला नाही. वीज जोडणी दिल्यानंतर सदरच्या रकमा पहिल्या बिलातून समायोजित करण्याची वि.प.ने तयारी दर्शविली आहे. मा. आयोगाच्या आदेशानुसार All infrastructure cost will be borne by MSEDCL त्यामुळे अंतर्गत कक्षाचे अध्यक्ष कार्यकारी अभियंता या दर्जाचे असतांना ही रक्कम का परत केली नाही ? हे गौंडबंगाल आहे. असो.

वि.प.ने सदरचे टर्मिनल पोलचे रु. १०००/– कपॅसिटर फीचे रु.५०/– व करारपत्र फी रु. २०/– परत देण्याची तयारी दर्शविली आहे, त्यामुळे या तिन्ही तक्रारी मंजूर करण्यात येत आहेत. वितरण कंपनीने तक्रार क्र. १२५/१० मध्ये रु. १२०/–, १२६/१० मध्ये रु. ७०/– व तक्रार क्र. १२७/१० मध्ये रु. १०७०/– या प्रमाणे तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे परत देण्याची तयारी दर्शविली आहे व सदरची रक्कम पहिल्या बिलींग सायकलमधून समायोजित करण्याबाबत मंचासमोर उभयबाजूंनी लेखी/ तोंडी मान्यता दिली आहे.

तक्रारदार यांनी विद्युत पुरवठा मिळणेसाठी चाचणी अहवाल दिल्याचे वि.प.ने मान्य केले आहे. संयुक्त तपासणी करुन तसेच तक्रारदारांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नियमाप्रमाणे वीज कनेक्शन द्यावे. येथे खेदाने नमूद करावेसे वाटते की, ग्राहक तक्रारदार यांचे प्रतिनिधी यांनी केवळ रु.१२०/– व रु. ७०/– साठी तक्रार केली आहे. तक्रार करण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांना भेटून कामाची पूर्तता करुन घेता आली असती. अशा स्वरुपाच्या तक्रारीमुळे श्री. खापरे व वि.प. यांचा वेळ तर गेलाच परंतु मंचालाही अशा प्रकरणांसाठी वेळ द्यावा लागतो. ग्राहकाचा जरी हा हक्क असला तरी अशा प्रकरणामध्ये वि.प.ला नोटीस देवून अथवा अंतर्गत कक्षाच्या निर्णयानंतर वि.प.च्या संबंधित अधिकाऱ्यांना भेटून कामाबाबत कार्यवाही करता आली असती. अशा प्रकरणां संबंधात श्री. खापरे यापुढे योग्य ती भूमिका घेतील अशी आशा करु या. खालील प्रमाणे आदेश –

## **आदेश**

१) तक्रार क्र. १२५/१०, १२६/१० व १२७/१० मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने तक्रार क्र. १२५/१० मध्ये रु. १२०/–, १२६/१० मध्ये रु. ७०/– व तक्रार क्र. १२७/१० मध्ये रु. १०७०/– या प्रमाणे तक्रारदार यांना द्यावेत. सदरच्या रकमेचे वीज जोडणी दिल्यानंतर पहिल्या बिलातून समायोजन करण्यात यावे.

३) वितरण कंपनीने तक्रारदार यांना स्पॉट इन्स्पेक्शन करुन तक्रारदारांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नियमानुसार किंवा प्राधान्याने वीज कनेक्शन द्यावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :